वर्ष : १४२

Regd.No. PCW/002/2021-2023-S.P.College Post-RNI No. 1755/1957

केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक ११ • पृष्ठे : १० • पाच रुपये • मंगळवार ११ जानेवारी २०२२, पुणे C (पुणे/अहमदनगर/सोलापूर आवृत्ती)

# अंशुल छत्रपती यांना डॉ. नरेंद्र दाभोलकर पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे विविध पुरस्काराची घोषणा

**पुणे :** महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका) साहित्य व समाजकार्य पुरस्कारांची घोषणा साधना ट्रस्ट आणि मासूम फाऊंडेशनतर्फे सोमवारी पत्रकार पाषरषदेत करण्यात आली. 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार' सामाजिक कार्यकर्ते अंशुल छत्रपती यांना जाहिर झाला असल्याची माहिती साधना ट्रस्टचे विनोद शिरसाठ यांनी सांगितले. एक लाख रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. यावेळी मासूम संस्थेचे रमेश अवस्थी आणि सुनिती सु. र. उपस्थित होत्या.

'दिलीप वि. चित्रे स्मृति साहित्य जीवनगौरव सन्मान 'माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांना तर, प्रेमाताई पुरव यांना 'समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार' देण्यात येणार आहे. दोन लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. 'पर्यावरण विषयक वाङ्मयप्रकार पुरस्कार 'संतोष शिंत्रे यांना जाहिर झाला आहे. अक्षरनामा वेबपोर्टलचे 'डिजीटल पत्रकारिता विशेष पुरस्कार' राम जगताप यांना देण्यात येणार आहे. एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे.

रमेश अंधारे यांच्या 'दगडी मक्ता' या कादंबरीला 'ललित ग्रंथ पुरस्कार, मुक्ता बाम यांना 'रा. शं. दातार नाट्य पुरस्कार', डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्या 'टिपंवणी' या साहित्यकृतीला 'अ-पारंपारिक-वैचारिक ग्रंथ पुरस्कार', सुरेश सावंत यांना 'कार्यकर्ता (प्रखबोधन) पुरस्कार', सुनीता भोसले यांना कार्यकर्ता (संघर्ष) पुरस्कार' देण्यात येणार आहे.

पन्नास हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे. युवराज गटकळ यांना 'युवा पुरस्कार' जाहिर झाला आहे. पंचवीस हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. कोरोनाचा प्रादूभावाचा आढावा घेऊन मार्च माषहन्यात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल, असेही शिरसाठ यांनी सांगितले.

Scanned with CamScanner